वि.खटला क्र. १५४/२०२३
शासन वि. विनायक
निशाणी क्र. ४१

**सरकारतर्फे साक्षीदार क्रमांक २ ची जबानी**

मी याव्दारे शपथेवर सत्य निवेदन करतो की,

नाव :- जयशंकर दास बिराजदार

वय सुमारे :- ३३ वर्षे, व्यवसाय :- शेती,

निवासस्थान :- दावतपुर ता. औसा जि. लातूर

**सरतपासणी सरकारपक्षातर्फे वकील श्री. एस.एन.चामले सहा.सरकारी वकील.**

**०१.** दिनांक ०६.०९.२०२३ रोजी पोलीसानी मला कुठे बोलावले नव्हते. आता मला पंचनामा दाखविला त्यावरील अनुक्रमांक एक वरील सही माझी आहे. पंचनाम्यातील मजकुराबाबत मला माहीत नाही. त्या पंचनाम्यावरील सहीपुरते **निशाण ४२** देण्यात आले.

**साक्षिदार अभियोग पक्षाच्या केसला दुजोरा देत नाही म्हणून सरकारी वकीलांनी साक्षिदाराची उलटतपासनी घेण्याची परवानगी मागितली, परवाणगी देण्यात आली.**

**उलटतपास सहा सरकारी वकील श्रीमती एस.एन.चामले**

**०२.** हे म्हणने खरे नाही की, दिनांक ०६.०९.२०२३ रोजी पोलीसानी मला विनायक बिराजदार यांचे घर नंबर ३४७ रा. दावतपुर येथे बोलावले होते. हे म्हणने खरे नाही की, विनायक बिराजदार यानी घटनास्थळ दाखविले. त्यांच्या अंगणासमोर दगडधोंडे पडले होते याबाबत मला माहीत नाही. हे म्हणने खरे नाही की, त्याप्रमाणे पोलीसानी पंचनामा केला तो वाचून पाहून त्यावर मी सही केली.

**०३.** हरिशचंद्र धोंडीराम बिराजदार याना मी ओळखतो कारण ते माझ्या गावचे आहेत. हरीशचंद्र बिराजदार हे सुध्दा घटनास्थळ पंचनाम्याचेवेळी हजर होते याबाबत मला

सांगता येणार नाही. मी माझ्या जन्मापासुन दावतपुर गावी राहतो. मी आरोपी विनायक बिराजदार याना ओळखतो. ते आजरोजी कोर्टात हजर आहेत. हे म्हणने खरे नाही की, विनायक बिराजदार हे माझे नातेवाईक आहेत व त्यांचे घर माझे शेजारी आहे. हे म्हणने खरे नाही की, गावामध्ये माझी व आरोपीची नियमीतपणे भेट होते. हे म्हणने खरे नाही की, आरोपीला मदत व्हावी म्हणून त्यांच्या सांगणेवरुन खोटी साक्ष देत आहे.

हे म्हणने खरे आहे की,

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री.जी.जी.मिटकरी**

**०४.** उलटतपास नाकारला.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

"समक्ष"

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत
दिनांक:-०२-०४-२०२५.

( डी.बी.माने )
सत्र न्यायाधीश – ३, लातूर